तिसऱ्या सहस्त्रकारंभी

# भारतीय नाट्य आणि नाटककार

संपादक :
प्रा. विनय मडगांवकर



गोवा विद्यापीठाचे संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन (VRPP)
आणि शासकीय महाविद्यालय केपे यांच्या संयुक्त विद्यमाने
आयोजित राष्ट्रीय परिसंवादात सादर केलेल्या शोधनिबंधांचा संग्रह

गोवा विद्यापीठाचे संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन (VRPP) आणि
शासकीय महाविद्यालय केपे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
राष्ट्रीय परिसंवादात सादर झालेल्या शोधनिबंधांचा संग्रह

## तिसऱ्या सहस्रकारंभी

# भारतीय नाट्य आणि नाटककार

**संपादक**
प्रा. विनय मडगांवकर
मराठी विभाग
गोवा विद्यापीठ

**प्रकाशक**
संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन
अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय
गोवा विद्यापीठ
ताळगाव-गोवा

# तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार

**Tisaṟyā sahasrākārambhī bhāratīya nāṭya 'āṇi nāṭakakāra**


**संपादक :** प्रा. विनय मडगांवकर
मराठी विभाग,
गोवा विद्यापीठ, ताळगाव-गोवा.
संपर्क : ८३०८४७७६६४
vinay@unigoa.ac.in



© **प्रकाशक :** संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन
अतिथी प्राध्यापक संशोधन संचालनालय (VRPP)
गोवा विद्यापीठ, ताळगाव-गोवा

**प्रकाशन क्रमांक : ०१**
प्रथम आवृत्ती : १५ ऑगस्ट २०२१

**ISBN : 978-93-5493-269-4**

**मुद्रक :** अथर्व एन्टरप्रायजेस, अस्नोडा, बारदेश - गोवा.

**मुखपृष्ठ :** गणेश हाडके


**मूल्य :** रुपये २००/-

**विशेष सहकार्य:**
'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार' हे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी गोवा विद्यापीठाच्या संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासनाचे (VRPP) आर्थिक सहकार्य प्राप्त झाले आहे.



***सूचना :*** *या पुस्तकात प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधात लेखकांनी स्वतःची मते मांडली आहेत. त्या सर्व मतांशी संपादक व प्रकाशन संस्था सहमत असतील असे नाही.*

# अर्पण पत्रिका



गोमंतकीय संतकवी नाटककार

**कृष्णंभट बांदकर**

यांना सादर समर्पित

# अनुक्रमणिका

**भारतीय नाटक आणि नाटककार**
- प्रेमानंद गज्वी . . . . . . . . . . १३

**मालवणी नाटक व मराठी नाटक यांचा अनुबंध**
- डॉ. बाळकृष्ण लळीत . . . . . . . . . . २३

**कोंकणी विनोदी नाटक : दशा आणि दिशा**
- डॉ. राजय पवार . . . . . . . . . . ३२

**'तिसऱ्या सहस्रकातील गुजराती रंगभूमी' : एक संक्षिप्त आलेख**
- डॉ. करंदीकर संजयकुमार . . . . . . . . . . ४०

**एकविसाव्या शतकातील हिंदी नाटक**
- डॉ.रमिता गुरव . . . . . . . . . . ४३

**कन्नड पथनाट्य आणि वर्तमान समस्या**
- डॉ. प्रभा वी. भट् . . . . . . . . . . ५०

**तिसऱ्या सहस्रकारंभी कोंकणी नाटक आणि नाटककार**
- डॉ. प्रकाश वजरीकार . . . . . . . . . . ५७

**तिसऱ्या सहस्रकारंभी गोमंतकीय मराठी नाटक**
- सारिका आडविलकर . . . . . . . . . . ६१

**तिसऱ्या सहस्रकारंभी 'कोंकणी तियात्र'**
- डॉ. कॉज्मा फेर्नांडीस . . . . . . . . . . ६९

**'२१ व्या शतकातील कोंकणी एकांकिका : स्वरूप आणि समीक्षा'**
- डॉ. हनुमंत चोपडेकर . . . . . . . . . . ७५

**सामाजिक आशयाचे पौराणिक नाटक 'अश्वत्थामा हत: '?'**
- डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन . . . . . . . . . . ८६

**ऐतिहासिक महानाट्यांचा विषय 'छत्रपती शंभूराजे'**
- प्रा. विनय मडगावकर . . . . . . . . . . ९८

**श्री विष्णु सूर्या वाघ यांच्या २००० नंतरच्या नाट्यसंहिता**
- देविदास शंकर आमोणकर . . . . . . . . . . १०५

**विठ्ठल गावडे यांच्या सामाजिक नाट्यसंहिता**
- प्रा. सोनिया सावंत. . . . . . . . . . . ११८

**समकालीनांना खुणावणारी, भासाची अभिजात नाटके**
- प्रा. अनघा देशपांडे . . . . . . . . . . १२७

**मराठी नाटकांचे चित्रपटात माध्यमांतर**
- उर्वी भट . . . . . . . . . . १३९

**Professor Varun Sahni**
Vice-Chancellor

**Goa University**



## Message

I am delighted to learn that the Directorate of Visiting Research Professor's Programme has published a book titled 'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार' (Indian Play and Playwrights in the Commencement of Third Millennium) edited by Shri Vinay Madgaonkar, Assistant Professor, Department of Marathi. This book contains papers presented by various scholars from Gujarat, Maharashtra, Goa and Karnataka of Indian plays in different languages during the National Seminar organised by Sant Sohirobanath Ambiye Chair under the Directorate of Visiting Research Professor's Programme in collaboration with Government College of Art, Science and Commerce, Quepem-Goa in February 2018.

'Natya' (नाट्य) is an innovative work of performance art, inspired by the cultural depiction of human emotions. The form of play varies depending upon the language in which the play is written. 'Drama' (नाटककार) as a form of literature has been included in the curriculum of various languages and literature studies at the College and University level.

I congratulate the Directorate of Visiting Research Professor's Programme for publishing the book and Shri Vinay Madgaonkar for editing the book 'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार'. I am sure the book will benefit researchers, scholars and students.

Varun Sahni

P. O. Goa University, Taleigao Plateau, Goa 403 206, India
Phone: +91 8669609001/02 (O) +91 832 2451375 (O) +91 9860900304 (R); Fax: +91 (0) 832 2451184 e-mail: vc@unigoa.ac.in

# ऐतिहासिक महानाट्यांचा विषय 'छत्रपती शंभूराजे'

**प्रा. विनय मडगांवकर**

## प्रास्ताविक

साहित्यविश्वात कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, प्रवासवर्णन असे विविध प्रकार मानले आहेत. यातील 'नाटक' हा साहित्यप्रकार असला तरी तो एक दृक्श्राव्य कलाप्रकार आहे. लेखकाच्या कलात्मकतेमुळे 'इतिहास-शास्त्र' आणि 'साहित्य-कला' या दोहोंचा संयोग ऐतिहासिक नाटकात घडून येतो. नाट्यसंहितेचे कलात्मक सादरीकरण हे नाटकाचे विशेष आहे. त्यामुळे नाट्यसंहितेत साहित्यिक मूल्याबरोबर सादरीकरणाचे मूल्यही अनुस्यूत असते. महानाट्याच्या संदर्भात 'महा' या उपसर्गाला साजेशा 'सादरीकरणाला' अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. तिसऱ्या सहस्त्रकारंभी नाटककारांनी छत्रपती शंभूराजांचा संघर्षात्मक इतिहास अशा महानाट्यातून सादर करण्यास प्राधान्य दिले आहे.

## इतिहास आणि नाटक

ऐतिहासिक व्यक्ती आणि त्यांच्या अनुशंगाने घडलेल्या घटना-प्रसंगांचे वस्तुस्थितीदर्शक असे सरळ साधे कथन म्हणजे इतिहास होय. इतिहास या संकल्पनेची व्यापकता इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी स्पष्ट केली आहे. त्यांच्या मतानुसार "विशिष्ट काळ, विशिष्ट वेळ आणि विशिष्ट व्यक्तीचे आचरण यांचा सांघात झाला असता प्रसंग ही वस्तु बनली जाते. अशा अनेक प्रसंगाच्या व्यवस्थित संगतीपासून इतिहासाची निर्मिती होते."[१] इतिहासकाराने ठरवलेल्या या निदानांच्या व अनुमानांच्या सहाय्याने साहित्यकार ऐतिहासिक साहित्यकृती साकार करतो. ऐतिहासिक घटना-प्रसंगाच्या संरचनेवर तो आपल्या प्रतिभेच्या बळाने साहित्यसृष्टीचा कल्पनारम्य साज चढवतो. कथा, कविता, कादंबरी, नाटक यांसारख्या यथायोग्य साहित्यप्रकारात तो त्या घटना, जिवंतपणे वाचकांसमोर

प्रकट करतो. त्यामुळे ऐतिहासिक साहित्यकृती केवळ ऐतिहासिक सत्य नसते, तर ते सत्याचे सचेतन रूप असते.  यासंदर्भात 'ऐतिहासिक नाटक' हा साहित्यप्रकार अभ्यासनीय आहेत.

**महानाट्य**

मानवाने आपल्या कलासक्त मनोवृत्तीमुळे प्रतिभेच्या बळावर विलोभनीय कलाविष्कार सादर केलेत. त्यापैकी चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, गायन, अभिनय, वक्तृत्व, लेखन अशा विविध कलांचे सांघिक प्रस्तुतीकरण करण्यास 'नाट्य' हा कलेचा उपयुक्त प्रकार आहे. तिसऱ्या सहस्त्रकारंभी महानाट्य प्रकार लोकप्रिय ठरला आहे. भिन्न अभिरुची असलेल्या प्रेक्षकांना प्रिय असलेल्या या विविध कलांचा आस्वाद महानाट्याद्वारे घेता येतो. 'महानाट्य म्हणजे छोट्या रंगमंचावर सदर करता येईल अशा नाट्यसंहितेचे मोठ्या रंगमंचावर भव्य नेपथ्य उभारून इतर पात्रांच्या गर्दीत मुख्य पात्रांनी साभिनय केलेले सादरीकरण होय,' असे म्हणता येईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित बाबासाहेब पुरंदरे लिखित 'जाणता राजा' हे 'महानाट्य' म्हणून प्रथमतः मराठी रंगभूमीवर सादर झाले. 'महानाट्य रंगमंचावर सादर न करता येण्यासारखे मैदानावर करायचे नाटक,'[२] असे म्हटले जाते. महानाट्याकरता महासंहिता असत नाही. ज्या नाट्यसंहितेच्या आधारे छोट्या रंगमंचावर नाटक सदर केले जाते, तीच संहिता महानाट्याकरताही उपयुक्त असते. महानाट्यात उघड्या मैदानावर मोठा रंगमंच, भव्य नेपथ्य, मुख्य पात्रांबरोबर प्राणी आणि मोठ्या संखेने इतर पात्रांच्या गर्दीचा समावेश, त्याला अनुरूप प्रकाशयोजना आणि ध्वनिसंयोजन यांचा उपयोग केला जातो. येथे नाट्यसंहितेपेक्षा सादरीकरणाच्या भव्यतेला महानाट्यात अधिक प्राधान्य दिले जाते.

**ऐतिहासिक नाटककार**

ऐतिहासिक नाटककार प्रतिभवंत असावा, त्याचबरोबर तो इतिहासाचा सजग अभ्यासक असायला हवा. नीर-क्षीर विवेक बुध्दीने सत्यासत्याचा त्यांने शोध घ्यायला हवा. लेखकाच्या कल्पनेतून गतकालीन समाजाच्या भावभावनांचे अनुकरणात्मक प्रकटीकरण नाट्याद्वारे होत असते. आभासी असले तरीही सत्य वाटणारे कलात्मक रूप दिग्दर्शक आणि कलाकारांमुळे नाट्यसृष्टीमध्ये अवतरते.

बहुतांवाशी ऐतिहासिक नाटककारांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरित्राला प्राधान्यक्रम दिला आहे. या पैकी अनेकांनी 'बखर साहित्य' हे साधनग्रंथ म्हणून अभ्यासले असल्याचे दिसून येते.

**बखर : इतिहास नव्हे, साधन ग्रंथ**

साधनग्रंथ म्हणून 'बखर साहित्य' अभ्यासना हे स्मरणात ठेवायला हवे, की बहुतेक बखरी या धन्याच्या सांगण्यावरून बखरकारांनी लिहिलेल्या आहेत. प्रसंगांची ऐकीव माहिती संकलित करतांना त्यात व्यक्तीनाम, स्थल-काल यांचा विपर्यास जाणवतो. काही बखरीतून एखाद्या व्यक्ती विशेषांवर जाणीवपूर्वक दोषारोपही केले आहेत. आशा पूर्वग्रहदुषित लेखनाला इतिहास मानणे, या संदर्भात अभ्यासक तथा नाटककाराने विचार करणे आवश्यक आहे. अशीच एक बखर म्हणजे मल्हार रामराव चिटणीस विरचित 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' ही बखर. ही बखर मल्हार चिटणीसाने हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या मृत्युनंतर १२२ वर्षांनी लिहिली. त्यात 'कोण्ही एक रुपवान स्त्री आली,' अशी काल्पनिक मांडणी केली आहे.

**श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र'**

मल्हार रामराव चिटणीस या बखरकाराचा खापर पणजोबा बाळाजी आवजी चिटणीस यांचा समावेश छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रधानमंडळात केला होता. प्रस्तुत बखरीच्या पाचव्या प्रकरणात 'बाळाजी आवजींचे चातुर्य' या उपप्रकरणात लेखकाने बाळाजीचे उदात्तीकरण केले आहे.[३] शिवरायांच्या निधनानंतर शंभूराजे छत्रपती झाले. राजद्रोहासारखे गंभीर अपराध क्षमा करून वडिलधाऱ्यांचा मान राखून शंभूराजांनी काही जेष्ठ लोकांना आपल्या प्रधान मंडळात सहभागी करून घेतले. परंतु आण्णाजीने शंभूराजांविरूद्ध केलेल्या षडयंत्रात बाळाजी आवजी चिटणीस यांचा सहभाग प्रमाणित झाल्यामुळे शंभुराजांनी त्यांना राजद्रोहाची शिक्षा म्हणुन हत्तीच्या पायाखाली दिले होते. याचा राग त्यांचे खापर पणतू तथा 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या बखरीचे लेखक मल्हार रामराव चिटणीस यांने 'संभाजी दिलेरखानाकडे' या उपप्रकरणांमध्ये शंभुराजांविषयी दोषारोप करून व्यक्त केला आहे. 'संभाजी महाराजांची मर्जी एका प्रकारची' असा उल्लेख करून 'कोण्हे एके दिवशी हळदी-कुंकू समारंभ शीतलागौरी,

यास सर्व सुवासिनी राजवाड्यात येणार, त्यात कोण्ही एक रुपवान स्त्री आली.' असे वर्णन या बखरीत केले आहे.[४] काही साहित्यिकांनी 'कोण्हे एके दिवशी आलेल्या कोण्ही एक रुपवान स्त्री,' हिचा इतिहास अभ्यासण्याऐवजी त्या निराधार प्रसंगाचा आधार घेत काही काल्पनिक स्त्री पात्रे आपल्या कल्पनेतून साकारली आणि शंभूराजांच्या चरित्रात जोडली. संभाजी महाराजांची ऐतिहासिक वास्तवाचा लवलेश नसलेली, चारित्र्य हनन करणारी अशीच पात्रे आपल्या साहित्यातून निर्माण केली.

## साहित्यातील शंभूराजे आणि काल्पनिक स्त्री पात्रे

चिटणीसाच्या याच बखरीच्या प्रभावाने अनेक साहित्यिकांनी काही काल्पनिक स्त्री पात्रे शंभूराजांच्या चरित्रात जोडली असल्याचे अभ्यासान्ति दिसून येते. कवी बी यांनी 'कमळा' हे दिर्घकाव्य रचून 'कमळा' या इतिहासात अस्तित्व नसलेल्या तथाकथित स्त्रीला साहित्यात प्रसिद्धी देत, “त्याला तेव्हा पासुनी कमळ बुरुज लोक म्हणती | नरनारी जन पोवाडा हा अजून तिचा गाती||” काविकल्पना मांडली. वास्तविक शिवनेरीच्या किल्याला 'कमळ बुरुज' नावाचा बुरुजाच नाही, कारण 'कमळा' या पात्राला शंभूराजांच्या चरित्र इतिहासात स्थान नाही. ना. के. सोनसुखार यांनी 'थोरातांची कमळा' या नाटकातून तर भालजी पेंढारकर यांनी 'थोरातांची कमळा' या चित्रपटामधून 'कमळा' या काल्पनिक पात्राला अधिक प्रसिद्ध केले. राजा बढेंनी 'रायगडचा राजबंदी' नाटकात गोदावरी हे पात्र रंगवले. तसेच 'तुळशी' हे आणखी एक काल्पनिक पात्र प्रथमतः आत्माराम मोरेश्वर पाठारे यांनी 'श्री छत्रपती संभाज राजा बढेंनी 'रायगडचा राजबंदी' नाटकात गोदावरी हे पात्र रंगवले. तसेच 'तुळशी' हे आणखी एक काल्पनिक पात्र प्रथमतः आत्माराम मोरेश्वर पाठारे यांनी 'श्री छत्रपती संभाजी' या नाटकात निर्माण केले. राम गणेश गडकरी यांनी 'राजसंन्यास' या नाटकात तर वि.वा.हडप यांनी “राजसंसार” नाटकात तुळसा पात्र प्रसिद्ध केले.

वसंतराव कानेटकरांनी 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकात शिवरायांच्या मनातील शल्य शोधण्याचा प्रयत्न केला, त्याचप्रमाणे शंभूराजांच्याही मनातील शल्य जाणून घ्यायला हवे होते. या नाटकातील पहिल्याच प्रवेशात सोईराबाईच्या संवादात शंभूराजांविषयीचा द्वेषच दिसून येतो. दुर्दैवी बेबंदशाही - वि.ह.औंधकर, छत्रपती - श.गो.घैसास, चिडलेला छावा - श्री.कृ.ओक, प्रणयीयुवराज - वा.न.शहा, आशा नाटककारांबरोबर द. ग. गोंडसें सारख्या इतिहास संशोधकाने आपल्या नाटकात 'राजयाचा पूत्र अपराधी देखा' मानून शंभूराजांना रंगभूमीवर आणले. या

सर्व कल्पनाविलासाच्या मूळाशी मल्हार रामराव चिटणीस विरचित 'श्री शिवछत्रपतींचे साप्तप्रकरणात्मक चरित्र' ही बखर होती. शंभूराजांच्या प्रभावशाली व्यक्तिमत्वाचे चारित्र्यहनन करणारी तथ्यहीन वाक्ये असलेल्या या बखरी विषयी डॉ. जयसिंगराव पवार यांनी आपल्या 'शिवछत्रपती एक मागोवा' या शोधग्रंथात सदर बखरकार "मल्हार रामाराव यांचे लिखाण पूर्वग्रहदुषित दृष्टीकोनातून केले आहे," असे म्हटले आहे.[५]

## शंभूचरित्र संशोधन सार

इतिहास संशोधक बा. सि. बेंद्रे यांनी शंभूराजांचा इतिहास अभ्यासला आहे. त्यंच्या मते "संभाजीची आग्रातील वागणूक व पंच हजारी म्हणून दरबारात वावरण्याची रीतभात व्यवस्थित व त्याच्या दर्जास शोभणारी असल्याशिवाय औरंगजेबाने त्याला चांगल्याप्रकारे वागवण्याचे मनांत घेतले नसते. अति कठीण परिस्थितीत संभाजीने कोणतीही गल्लत होऊ न देता दिवस काढले, हे त्याच्या जन्मतःच जाणकार निग्रही व उमद्या प्रवृत्तीचे द्योतक आहे."[६] बा. सि. बेंद्रे यांनी ऐतिहासिक पत्रव्यवहाराचा अभ्यास करून शंभूराजांविषयी मांडलेले हे मत लक्षवेधी आहे.

शंभूराजांनी मोंगलांशी दिलेली झुंज किती पराकोटीची होती याचा पुरावा सदाशिव शिवडे यांनी दिला आहे. '३० जुलै १९८२ च्या पत्रातून कारवारकर इंग्रज सुरतकाराना लिहितात, "मोंगल बादशहा संभाजी विरुद्ध इतका चिडला आहे की त्याने आपल्या डोक्याची पगडी (किमोश) खाली उतरवली आणि शपथ घेतली की 'त्याला मारल्याशिवाय मी ती डोक्यावर घालणार नाही." अशी प्रतिज्ञा केली आहे.'[७] हे वास्तव नाकारून पूर्वी काही नाटकारांनी शंभूराजांना अयोग्यरित्या प्रस्तुत केले. आता काळ बदलला. ज्वल ज्वलन तेजस, पराक्रमी शंभूराजांच्या जीवनातील अशा वास्तविक इतिहासाला प्राधान्य देत ऐतिहासिक साहित्यकृतिचे लेखन करण्यास नवे साहित्यिक प्रवृत्त होत आहेत, असे आशादायी चित्र पाहायला मिळत आहे.

## महानाट्यातून सादर झालेला शंभूराजांचा रौद्र पराक्रम

एकविसाव्या शतकात शंभूराजांच्या चरित्रात्मक साहित्य लेखनात 'सत्यमेव जयते' या उद्घोषाचा प्रत्यय यायला आरंभ झाला होता. साहित्यिक, अभ्यासक, संशोधक यांनी मिळवलेले पुरावे, शोध-संशोधन याला यश प्राप्त होऊ लागले.

अवमान आणि अवहेलनेच्या जळजळीत आग्निदिव्यातून लखलखीत नवातेजाने शंभूचरित्र नव्याने लोकांसमोर आले. ज्याआधारे 'शंभूराजे' सारख्या नाटकामधून सुरेश चिखले सारखे नाटककार प्रामाणिकपणे शंभूराजांचा वास्तविक इतिहास लालित्यपूर्ण पद्धतीने मांडू लागले. २००० ते २०२० च्या काळात गोवा-महाराष्ट्रात शंभूराजाचा प्रेरणादायी इतिहास महानाट्यांच्या माध्यमाने नव्याने प्रेक्षकांसमोर प्रस्तुत केला गेला.

निलांगी शिंदे लिखित 'शंभूराजे' हे महानाट्य बालसुलभ मनावर संस्कारक्षम प्रभाव पडणारे ठरले. हे नाट्य शालेय विद्यार्थी सादर करात असतांना जेष्ठ सजग प्रेक्षांनाही ते आवडेल अशी इतिहासिक नाट्यसंहिता लेखन करण्याचे आव्हान निलांगीताईने स्वीकारले आणि त्यात त्या यशस्वीही झाल्या. गणेश ठाकूर लिखित 'शिवरत्न शंभूराजे' या महानाट्यात लेखकाने इतिहासाचा अभ्यास करून चारित्र्यवान शंभूराजांवरील काही आरोपांना प्रत्युतर देण्याचा प्रयत्न केला आहे.

महेंद्र महाडीक लिखित 'शिवपुत्र संभाजी' या महानाट्यात लेखकाने शंभूराजांच्या अपरिचित इतिहासाला प्राधान्य देत वास्तवदर्शी इतिहास आपल्या संहीतेमधून साकार केला. रयतेला छळणाऱ्या सिद्धीचा पराभव करण्यासाठी उफाळत्या समुद्रात ८०० मीटर लांबीचा भराव टाकून पूल बांधणारा आणि नावेतून जंजीऱ्यावर तोफा डागणारा शंभूराजा, गोवा जिंकण्यासाठी पोर्तुगिजांबरोबर लढणारा या नाटकातील शंभूराजा प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहतो. अशा महानाट्यामधून प्रेक्षकांच्या मनात प्रेरणादायी संस्कारक्षम विचार रुजवला जात आहे, हे या महानाट्यांचे फलित होय.

## समारोप

छत्रपती शंभूराजांनी 'बुधभुषण' या ग्रंथाची निर्मिती केली. स्वतःच्या पत्नीचा “श्री सखी राज्ञी जयती” असे म्हणून सन्मान केला. शंभूराजे दोन वर्षाचे असतांना आई सईबाई स्वर्गवासी झाल्या, किशोर वयात आजी जिजाऊचे छत्र हरपले. कालांतराने वडील छत्रपती शिवाजी महाराज दिवंगत झालेत. प्रधान मंडळ, आप्त स्वकीय विरोधात उभे राहिले. संकटात असतांना जवळचे आप्त सोडून गेले, विषप्रयोग झाले, बदनामी झाली तरीही शिवप्रभूंच्या स्वराज्य रक्षणार्थ ज्वल ज्वलन तेजस छत्रपती शंभूराजे सलग ९ वर्षे सिद्धी, मोघल, इंग्रज, पोर्तुगीज अशा देशी विदेशी शत्रूंशी ते शर्थीने झुंज देत अखेरपर्यंत लढत राहिले. नव्या नाटककारांना या

सर्व विषयांचा सखोल अभ्यास करणे अनिवार्य आहे.

**निष्कर्ष**

१) भव्य नेपथ्य उभारून मोठ्या रंगमंचावर इतर पात्रांच्या गर्दीत मुख्य पात्रांनी साभिनय केलेले नाट्यसंहितेचे सादरीकरण म्हणजे महानाट्य होय.

२) छोट्या रंगमंचावर सदर करता येईल अशी नाट्यसंहिता महानाट्याच्याही सादरीकरणास उपयुक्त ठरते.

३) ऐतिहासिक नाटककार प्रतिभवंत असावा, त्याचबरोबर तो इतिहासाचा सजग अभ्यासक असायला हवा.

४) इतिहास आणि कल्पना यांचा यथायोग्य सुमेळ ऐतिहासिक नाटकांमध्ये अनुस्यूत असतो.

५) पूर्वीच्या काही ऐतिहासिक नाटकांमधून असत्य गोष्टी दर्शवून छत्रपती शंभूराजांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाला होता.

६) नव्या नाटककारांनी इतिहासाचा सजगपणे अभ्यास करून प्रज्ञावंत, झुंजार धर्मवीर शंभूराजे रंगभूमीवर आणले.

७) महानाट्याद्वारे सादर होणाऱ्या छत्रपती शंभूराजांच्या चरित्राला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त होत आहे.

**संदर्भ** :


१. सरदेसाई, माया, भारतीय रंगभूमीची परंपरा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. १२.

२. https://mr.wikipedia.org/wiki/महानाट्य

३. मल्हार रामराव चिटणीस विरचित 'श्री मल्हार रामराव चिटणीस विरचित 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र', संपा. र. वी. हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे, २०००. पृ. १६३

४. तत्रेव. पृ.२३६.

५. पवार, जयसिंगराव, 'शिवछत्रपती एक मागोवा', मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, २०१८, पृ. ६७.

६. बेंद्रे, बा. सि., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, बा. सि. बेंद्रे, मुंबई, पृ. १९७२. पृ. ६२३.

७. शिवडे, सदाशिव, महाराणी येसूबाई, स्नेहल प्रकाशन पुणे, २०१२, पृ. ६८.


●●●